दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३२६
पाने : ०६, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.०७ जुलै २०२५




# बा विठ्ठला... बळीराजाला सुखी व समाधानी ठेव, राज्यावरील संकटे दूर कर - मुख्यमंत्र्यांचे विठ्ठल चरणी साकडे

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०६, पंढरपूर :** पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरिता आशीर्वाद द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घातले.



आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी कैलास दामु उगले, कल्पना कैलास उगले यांच्या समवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्री म होदय यांचा सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सौ. अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार संजय सावकारे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्यासह समितीचे सर्व सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री. फडणवीस म्हणाले की, वारीची परंपरा सातत्याने वाढत आहे आणि यावर्षी तर वारीने एक नवीन विक्रम केलेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारकरी या वारीमध्ये चालत पांडुरंगाच्या दर्शनाकरीता या ठिकाणी आले. ज्या दिंड्या आहेत त्या सोबत तर वारकरी आलेच परंतु पायी चालत ही मोठ्या प्रमाणात वारकरी आले. विशेषत: या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे. शासन व प्रशासनाने वारकऱ्यांना चांगल्या सुविधा दिल्या आहेत. पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वात प्रशासनाने चांगले जर्मन हँगर तयार केल्याने वारकऱ्यांसाठी चांगली व्यवस्था झाली, असे त्यांनी सांगितले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे. दिंड्या सोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. वारीत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंग पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करतांना नवी ऊर्जा मिळते. वारीने खऱ्या अर्थाने भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली. निर्मल वारीच्या माध्यमातून अतिशय चांगला आवश्यक व्यवस्था उपलब्ध केल्याने कुठेही अस्वच्छता पाहायला मिळाली नाही आणि निर्मल वारी सोबत हरित, पर्यावरण पूरक वारीदेखील झाली. खऱ्या अर्थाने आपल्या संतांनी जो स्वच्छतेचा संदेश दिलेला आहे तो या वारीमध्ये प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला. राज्याच्या गतीमध्ये अध्यात्मिक प्रगती म हत्त्वाची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. यावेळी पालकमंत्र्यांनी आणि जिल्हा प्रशासनाने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे सर्वसामान्य भाविकांचा श्री विठ्ठल दर्शनाचा कालावधी पाच तासाने कमी झाल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. प्रारंभी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समि तीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रस्तावित केले. यामध्ये यावर्षीच्या आषाढी वारीमध्ये शासन व जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी खूप चांगल्या सुविधा दिल्याम ुळे वारकरी वर्ग समाधानी असून वारकऱ्यांची संख्या वाढली आहे व त्यावर योग्य नियंत्रण ठेवले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी मु.पो. जातेगांव ता. नांदगांव जि. नाशिक येथील कैलास उगले आणि कल्पना उगले या वारकरी दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडवणीस यांच्या हस्ते महापुजेनंतर यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना मोफत वर्षभर एसटी पास मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार वितरण**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पायी स्वच्छता आणि सामाजिक विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांचा 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. प्रथम क्रमांक - श्री संत रोहिदास दिंडी क्रमांक १३, जगदगुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा. द्वितीय क्रमांक - श्री बाळकृष्णबुवा वारकरी दिंडी क्रमांक १९, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा. तृतीय क्रमांक - श्री गुरु बाळासाहेब आजरेकर दिंडी क्रमांक २३, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा.

## भारताचा इंग्लंड्वर दणदणीत विजय ! इंग्लंडचे गर्वहरण करत, ब्रिटीशांच्या मैदानात तिरंगा फडकला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, बर्मिंगहम :** इंग्लंडचे गर्वहरण करत भारतीय संघाने ब्रिटीशांच्या मैदानात तिरंगा फडकवला. दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताने देदिप्यमान कामगिरीचा नजराणा पेश केला. शुभमन गिलने द्विशतकासह भारताच्या विजयचा पाया रचला होता. भारताच्या गोलंदाजांनी त्यावर कळस चढवला आणि त्यामुळे भारताला हा दुसरा सामना जिंकता आला.



भारताने या सामन्यात ३३७ धावा राखत मोठा विजय मिळवला. या सामन्यातील विजयासह भारताने मालिकेत १-१ अशी बरोबरी केली आहे. पहिला कसोटी सामना भारताला गमवावा लागला होता. त्यानंतर या सामन्यातील विजयासह युवा भारताने या मालिकेत आता १-१ अशी बरोबरी केली आहे.

शुभमन गिलने पहिल्या डावात द्विशतकत झळकावले, तर दुसऱ्या डावात त्याने शतकही पूर्ण केले. त्यामुळे गिलच्या या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर भारताने इंग्लंडपुढे विजयासाठी ६०८ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने इंग्लंडची चौथ्या दिवशी ३ बाद ७८ अशी अवस्था केली होती. त्यानंतर पाचव्या दिवशी भारताला विजयासाठी सात विकेट्सची गरज होती. पण पाचव्या दिवसाच्या सुरुवातीला जोरदार पाऊस आला आणि सामना वेळेत सुरु झाला नाही. पण पावसानंतर भारतीय गोलंदाजांच्या अचूक गोलंदाजीने इंग्लंडच्या फलंदाजांच्या नाकी नऊ आणले होते. खासकरुन आकाश दीप त्यावेळी आग ओकत होता. आकाश दीपने एकामागून एक दोन धक्के इंग्लंडला दिले.

आकाश दीपने प्रथम ऑली पोपला २४ धावांवर असताना क्लीन बोल्ड केलं. त्यानंतर आकाश दीपने अप्रतिम चेंडू टाकत भारताच्या विजयाच्या मार्गात अडसर ठरत असलेल्या हॅरी ब्रुक्सला बाद केलं. यावेळी आकाशने एवढा वेगवान चेंडू टाकला की, आपण बाद झालो, हे हॅरीला समजलंच नाही. त्यांनतर बेन स्टोक्सचा अडसर वॉशिंग्टन सुंदरने दूर केला. पण यावेळी जेमी स्मिथ भारताच्या विजयाच्या मार्गातील मोठा काटा होता. पण आकाश दीपने त्याला ८८ धावांवर बाद केले आणि तिथेच भारतीय संघाचा विजय निश्चित झाला.

भारताने या सामन्यात अचूक गोलंदाजी केली आणि त्याचा फायदा त्यांना झाल्याचे पाहायला मिळाले.

## पारनेर साखर कारखाना गैरव्यवहाराच्या गुन्ह्याची स्थगिती उठविली !

### अहमदनगर सत्र न्यायालयाचा निकाल...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** तालुक्यातील देवीभोयरे येथील पारनेर सहकारी साखर कारखान्याच्या विक्रीत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात जानेवारी महिण्यात दाखल झालेल्या गुन्ह्याच्या चौकशीला दिलेली तात्पुरती स्थगिती पुढे कायम करण्यास अहमदनगर येथील सत्र न्यायालयाने नकार दिला आहे. येथील प्रधान सत्र न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे यांनी हा निकाल दिला. पारनेर सहकारी साखर कारखान्याची बेकादेशीर विक्री केल्याप्रकरणी सुमारे ४०० कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे कारखाना बचाव समितीचे म्हणणे आहे .



याप्रकरणी दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई व क्रांती शुगर अँड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड पुणे, या खाजगी कंपनीच्या संचालक मंडळा विरुद्ध पारनेर प्रथम वर्ग न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिलेले होते, न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिसांनी बँकेचे दोन वरीष्ठ अधिकारी व क्रांती शुगर कंपनीचे नऊ संचालक अश्या अकरा आरोपींविरुद्ध, संगणमताने विश्वासघात, फसवणुक, बनावटगीरी व आर्थिक अपहार या कलमांखाली गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर आरोपींनी पारनेर न्यायालयाचे आदेशाला अहमदनगर सत्र न्यायालयात आव्हान दिले होते. सत्र न्यायालयाने पारनेर न्यायालयाच्या आदेशाला तात्पुरती स्थिती दिली होती व पारनेर न्यायालायाकडील दाखल कागदपत्रे मागवून, फिर्यादीला आपले म्हणणे मांडण्याची नोटीस बजावली होती.

त्यानंतर, याप्रकरणी अहमदनगर येथील प्रधान सत्र न्यायाधीश यांचे कोर्टात सुनावणी पूर्ण झाली. फिर्यादी असलेल्या पारनेर साखर कारखाना बचाव व पुर्नजिवन समितीने साखर कारखाना विक्रीतील गैरव्यवहाराची सर्व कागदपत्रे न्यायालयासमोर हजर केली व पारनेर येथील प्रथम वर्ग न्यायालयाने दिलेला निर्णय योग्य असल्याचा युक्तिवाद केला.

सत्र न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला व पारनेर न्यायालयाचा निर्णय योग्य ठरवत याप्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यातील दाखल गुन्ह्याचे तपासाला दिलेली तात्पुरती स्थगिती रद्द केली. आरोपींनी केलेला गुन्हा हा सतरा हजार शेतकरी व सभासदांच्या सहकारी संस्थेशी निगडीत आहे. त्यामुळे या गुन्ह्याचा सखोल तपास होणे आवश्यक असल्याचे मत न्यायालयाने निकालपत्रात नोंदवले आहे. तसेच,

पारनेर येथील प्रथम वर्ग न्यायालयाने दिलेल्या निर्णयात आम्ही हस्तक्षेप करू इच्छित नाहीत असाही निर्वाळा सत्र न्यायालयाने दिला. पारनेर साखर कारखाना बचाव समितीच्या वतीने

अँड. प्रज्ञा तळेकर, अँड. राजेश कातोरे, अँड. अजिंक्य काळे, अँड. रामदास घावटे यांनी बाजू मांडली.

## थोडक्यात

### आषाढी निमित्त पैठण शहरात भाविकांची मोठी गर्दी

#### शहरात तगडा पोलीस बंदोबस्त...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, पैठण (छ. संभाजीनगर) :** आषाढी एकादशी निमित्त आज सकाळपासुनच भक्त भाविकांची गर्दी पाहवयास मिळाली आलोट गर्दीचा अंदाज आल्याने पो.नि.गोरमे यांनी शहरात कडक बंदोबस्त लावला होता. शहरात प्रवेश करणार्या सर्वच बॅरिगेट लावल्याने शहरात जडवाहनांना प्रवेश नव्हता त्यामुळे भक्त भाविकांना चालतांना वाहनांचा त्रास झाला नाही, तर स्नानासाठी देखील भाविकांनी सर्वच घाटांवर गर्दी केली होती.



शहरात वीस पोलिस आधिकारी जवळपास दोनशे खर्मचार्यांचा ताफा भक्तांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आला. तर प्रवेश करणार्या सर्वच मार्गाकडून भक्तांचे लोंढे शहरात दाखल होत होते. त्यात महिला पुरुष आबाल वृध्दांचा देखील समावेश होता, शहरातील सर्वच रस्ते भाविकांनी फुल्ल झाली होती, छोट्या मोठ्या दिंड्याच्या टाळ मृदुंगाच्या गजराने शहर भक्ती रसात न्हाऊन निघाला होता.

तर जागोजागी सेवाभावी संस्थेकडून भाविकांना फराळाचे वाटप करण्यात होते तर महावितरणचे अभियंता सुजीत वंगळ व त्यांच्या कर्मचार्यांनी मौलाना दर्गा परिसरातुन शहरात दाखल होणार्या भक्तासाठी फराळाची सोय केली होती. नाथमंदीर परिसरात देखील मोठी गर्दी झाली होती, जे भक्त आषाढीसाठी पंढरपुरला जाऊ शकत नाही, ते भक्त भाविक नाथांच्या दर्शनासाठी पैठणला येतात व समाधीचे दर्शन घेऊन धन्य होतात.

### अति पावसाने वाई तालुक्यात पेरण्या खोळंबल्या !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, वाई (सातारा) :** वाई तालुक्यात सततच्या अति पावसाने खरीप हंगामातील पेरण्या खोळंबल्या असून यंदाचा खरीप हंगाम वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे जून महिन्यात खरीप हंगामातील भुईमूग सोयाबीन काळा घेवडा वाघा घेवडा वाटाणा उडीद चवळी मुग आधी खरिपातील कडधान्य उत्पादन शेतकरी वर्ग घेत असतो कडधान्य वर्षभरात पुरेल व आर्थिक मदत करणारे धान्य म्हणून शेतकऱ्यांना फायदेशीर ठरतात मात्र यंदा जुलै महिन्यापर्यंत पावसाने उघडी न दिल्याने शेतजमिनी पडून असून पेरणीसाठी चांगल्या वापसाची शेतकरी वाट पाहत आहेत नगदी पीक म्हणून हळदीचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात घेतले जाते यंदा हळद पिकाची लागवडी रखडल्याने शेतकरी चिंतेत आहे बागायती ऊस पिकासाठी पाऊस फायदेशीर ठरत असून ऊस पिकाची जोमात वाढ चालू आहे बागायती पिकांसाठी पाऊस फायदेशीर ठरत असला तरी खरीप हंगामातील कडधान्य पिके नागरी जीवनासाठी महत्त्वाची असून अशा खरीप हंगामातील पेरणीसाठी शेती करी पाऊस उघडण्याची वाट पाहत आहे. वाई तालुक्याच्या पश्चिम भागात भात हे मुख्य पीक घेतले जाते चालू वर्षी शेतकऱ्यांनी भाताचे रोपेतरवे टाकले असून रोपे पिवळी पडली असून वाया जाण्याची भीती शेतकऱ्यात झाली आहे वाड्यावर रस्त्यावरील जिरायत भागात खरिपाची पेरण्या झाल्या असून सोयाबीन घेवडा भुईमूग पिकांची उगवण चांगली झाली आहे. मात्र पान स्थळ जमिनी सततच्या पावसाने चिखल झाला असून अशा जमिनीला पेरणीयुक्त वापसा आला नसल्याने पेरण्या रखडल्या आहेत पेरण्या उशिरा झाल्यास रब्बी हंगामातील ज्वारी गहू बाजरी पिकाच्या उत्पन्नावर मोठा परिणाम होणार आहे.




# अनुशासन पर्वाची 'शिदोरी'!

आणीबाणीच्या निर्णयाबद्दल शीर्षस्थ पक्षनेत्यांनी असमाधान व्यक्त केले असतानाही मुखपत्रातून त्याचे सरसावून समर्थन करण्याचे धाडस महाराष्ट्र काँग्रेसने दाखविले. भारतीय राजकारणातील बहुचर्चित घोषणेची पन्नाशी झाल्याने सध्या आणीबाणीची व्यापक चर्चा आहे. २५ जून १९७५ रोजी जाहीर केलेल्या 'इमर्जन्सी एपिसोड'बद्दल काँग्रेसने माफी मागावी, अशी मागणी आजवर बरेचदा झाली. 'अनुशासन पर्वा'चा उल्लेख होताच, पवनारमध्ये आचार्य विनोबा भावे आणि काँग्रेसचे नेते वसंतराव साठे यांच्यातील भेटीचे स्मरण होते. त्या भेटीला तीन दिवसांनी पन्नास वर्षे होतील.

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जाचक निर्णयांबद्दल वाईट वाटत असल्याची खंत व्यक्त केली होती. जानेवारी १९७८मध्ये यवतमाळातील सभेत बोलताना त्यांचा सूर इतरांनी न स्वीकारलेल्या निर्णयांची जबाबदारी स्वीकारण्याचा होता. अराजकी वातावरण टाळण्यासाठीच कठोर निर्णय घेतल्याचा पुनरुच्चार त्यांनी केलाच. 'कोणत्याही सरकारने अशा निर्णयांच्या वाट्याला जाऊ नये, हा धडा आणीबाणीने शिकविला,' असे काँग्रेस नेत्या सोनिया गांधी २००४मध्ये म्हणाल्या होत्या. चार वर्षांपूर्वी अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठात बोलताना राहुल गांधी यांनीही आणीबाणीचा निर्णय समर्थनीय नसल्याचे सांगितले होते.

स्वातंत्र्य आंदोलनातील दूरस्थ सहभागाबद्दल जसे विरोधकांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला घेरणे सोडलेले नाही; तसेच आणीबाणीबद्दल जनमनातील शंकांचे निरसन करण्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला यश आलेले नाही. 'शिदोरी' या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या मुखपत्राने यंदा आणीबाणीच्या समर्थनाचा विशेषांक काढून धक्का दिला. 'संविधानिक आणीबाणी ते अघोषित हुकूमशाही' या शीर्षकाने प्रारंभ होणाऱ्या या अंकात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आणीबाणीची अपरिहार्यता मांडली. जयप्रकाश नारायण विजयी मिरवणूक टाळून इंदिरा गांधींच्या निवासस्थानी गेले, तेव्हा दोघांचेही डोळे पाणावले होते, याकडे सपकाळ लक्ष वेधतात. विजय वडेट्टीवार यांच्या 'अनुशासन पर्व' लेखात विनोबांचा इवलासाही संदर्भ नाही. त्रिस्का चौकशी आयोगाने चार कोंबड्या आणि दोन अंडी चोरल्याच्या आरोपावरून इंदिरा गांधींवर खटला दाखल केला आणि त्यांना मणिपूरच्या कोर्टात उपस्थित राहण्यास भाग पाडले, याची आठवण त्यांनी करून दिली आहे. स्वातंत्र्यानंतर झाले नसेल एवढे काम आणीबाणीत झाल्याचा वडेट्टीवारांचा दावा आहे.

जेआरडी टाटा, बाळासाहेब ठाकरेंसारख्या दिग्गजांनी आणीबाणीचे समर्थन केल्याचे दाखले एरवी दिले जातात. 'अनुशासन पर्व' शब्द देणाऱ्या विनोबांच्या भूमिकेचे गुऱ्हाळ अजूनही सुरू आहे. काँग्रेसचे नेते वसंतराव साठे पवनारला गेले. विनोबांनी 'इमर्जन्सी अनुशासन पर्व' असे स्वत: त्यांना लिहून दिल्याचा उल्लेख विनोबांच्या 'मैत्री' मासिकाच्या संपादक, गांधीवादी कार्यकर्त्या निर्मला देशपांडे यांनी केला होता. विनोबांचे उद्गार टिपून घेणाऱ्या पवनार आश्रमातील साधक कुसुम देशपांडे यांच्या नोंदीत मात्र तफावत आहे. 'ह्या नव्या पर्वानंतर मुद्दाम तुम्हाला भेटायला आलो,' अशी चिठ्ठी बापूसाहेब साठेंनी विनोबांना दिली. त्यातील 'ह्या नव्या पर्वानंतर' ही अक्षरे विनोबांनी अधोरेखीत केली आणि त्याखाली 'अनुशासन पर्व?' लिहिले असे कुसुम देशपांडे म्हणतात. विनोबांचे प्रश्नचिन्ह काँग्रेसजनांनी खुबीने टाळले. सोयीस्कर प्रचार केला.

स्वतंत्र भारताला ३५ वर्षे विनोबांचे मार्गदर्शन लाभले. स्वातंत्र्योत्तर सात निवडणुकांमध्ये त्यांनी एकदाही मत दिले नाही. 'सरकारी संत' हा उपरोध मात्र त्यांना सोसावा लागला. 'आचार्यांचे म्हणजेच तत्त्वज्ञांचे अनुशासन जगावर चालले, तर शांतता लाभेल हे मला सुचवायचे होते,' असा खुलासा विनोबांनी मौनव्रत संपल्यावर केला. साठे-विनोबा भेट १९७५मधील ६ जुलैची. स्पष्टीकरण आले २५ डिसेंबरला. पवनार भेटीनंतरच्या पाच महिन्यांतील मौनाचा काँग्रेसने फायदा करून घेतला. २१ महिन्यांच्या आणीबाणीनंतर आलेले विरोधी पक्षांचे सरकार २८ महिन्यांतच गारद झाले. अलीकडे साऱ्याच पक्षांत बोलघेवडेपणा वाढला आहे. मौनाची 'शिदोरी' मटकावल्याबद्दल एकट्या काँग्रेसलाच बोल लावून काय फायदा?

# मानवाचे मन आणि निसर्गाची मनमोहक हिरवळ



यावर्षी पावसाने भारी कमालच केली म्हणायची. उन्हाळ्यात धो धो बरसला आणि आता ऐन मोसमात

त्याने हुलकावणी दिली आहे. इतरत्र पावसाने धुमाकूळ घातलाय आणि नेमका आमच्या भागातून त्याने काढता पाय घेतला आहे. दरवर्षी मृग नक्षत्राला आरंभ झाला की आमच्या मनात नवीन स्वप्नांचा बाजार भरतो जणू. पाऊस चांगलाच कोसळणार, नद्यांना पूर येणार, सगळी धरणी ओलेचिंब होणार, पावशा पक्षी पेरते व्हा चे मधूर गीत गाणार आणि शेतकरी शेतात जीवाभावाच्या बैलांच्या भरवशावर पेरणी करणार. अधून मधून पावसाच्या सरीवर सरी येणार आणि नुकतेच जमिनीतून बाहेर आलेल्या नाजूक कोंबाना गोंजारणार. बघता बघता इवले इवले नाजूक कोंब मोठे होत जाणार. एरव्ही काळी दिसणारी आपली धरणी आई हिरवळीने नटणार! ही हिरवळ भारी मनमोहक असते, मनाला मोहून टाकते. एक आगळावेगळा आनंद देऊन जाते.

**पावसाच्या आगमनाची**
**लागता चाहूल**
**थुई थुई नाचे मोर**
**हळूच वाहणारा वारा**
**अचानक धरतो जोर**
**ढगांचे संघनन**
**पावसाचे आगमन**
**टपोरे थेंब,वाऱ्याची गिरकी**

**ओलेचिंब होई धरणी**

शहरातील सिमेंट काँक्रिटच्या जंगलातून बाहेर पडून गावाकडच्या शिवारात प्रवेश केल्यावर हिरवा निसर्ग पाहिला की मन प्रसन्न होते. एकीकडे डोंगरमाथा, दुसरीकडे विस्तीर्ण पसरलेला रान शिवार आणि हिरव्या झाडांच्या गर्दीत लपलेला गाव पाहिला की बालपण जसेच्या तसे आठवते. पेरणी आणि आषाढी वारीचा पंधरवडा हा काळ मानवी जीवनाचा अत्यंत व्यस्त काळ. शेतकऱ्यांना आणि वारकऱ्यांना उसंत घ्यायला अजिबात वेळ नसतो. इकडे शेतकरी शेतात पेरणीच्या कामात भान हरपून गुंतलेला आणि तिकडे वारकरी पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपूरच्या दिशेने वारीत पायपीट करणारा. शेतकऱ्यांना साऱ्या जगाची भूक मिटवण्याची काळजी तर वारकऱ्यांना साऱ्या जगाची काळजी घेणाऱ्या पांडुरंगाच्या दर्शनाची आतुरता!पेरणी आटोपते शेतकरी थोडे निवांत होतात. वारकरी पंढरपुरात पोहचतात, विठोबाचे दर्शन घेऊन तृप्त होतात. आषाढी एकादशी संपूर्ण महाराष्ट्राचा एक अद्वितीय सोहळा!

वारकरी जमतात, माऊली माऊली या गजर सुरात एकमेकांची गळाभेट घेतात. हर्ष दाटलेल्या नजरेने पांडूरंगाचे दर्शन घेतात आणि मनोभावे पांडुरंग डोळ्यात, हृदयात साठवून ठेवतात.दुसऱ्या दिवशी वारी परतीच्या वाटेला लागते. पावसाचा जोर वाढतो. शेतकरी सुखावतो आणि दिवसागणिक वाढणारे शेतातील हिरवे पिक पाहून हरकून जातो. खरोखर निसर्ग सगळ्यांचा गुरू. वाट चुकलेल्या दांडगटांना वाटेवर आणणारा,जीवनाची वाट सरळ दिशेने चालायला शिकवणारा. पाऊल वाकडा पडू लागला तर

वेळीच पायबंद घालतो, अति लोभ करणाऱ्यांना कायमची अद्दल घडवतो. आषाढ संपतो, श्रावण सुरू होतो. तेव्हा धरतीचे रूप एकदम पालटलेले असते. जिकडे पहावे तिकडे मनमोहक हिरवळच हिरवळ. हिरवळीने नटलेली, हिरवा शालू नेसलेली धरणीमाता पाहून मनाची निष्ठूरता संपते. मन प्रसन्न होते. हिरवळीची ती मनमोहक अदा कितीही पाहीली तरी मन भरत नाही. मनाची तृप्ती होत नाही. झाडे कशी हिरवीगार, उंचीने लहान थोर.

पानांची सळसळ, वाऱ्याची झुळूक. नदी व ओढ्यातील स्वच्छ नितळ व झुळझुळ वाहणारे पाणी पाहिले की ते प्यावेसे वाटते. नकळत हातांची ओंजळ तयार होते, ओंजळीतले ते वाहते पाणी कधी ओठातून पोटात जाते कळत नाही.

**हिरवा निसर्ग**
**हिरवळीने नटलेला**
**पाहून मनात**
**हर्ष दाटलेला**

उन्हाळ्यात धरणीचे ओसाड, उजाड आणि रखरखीत रूप पाहून मनाला एक प्रकारची मरगळ आलेली असते. श्रावणातील हिरवी धरणी माता पाहिली की मनाचा ओसाडपणा आपोआप संपतो. श्रावण महिना आणि हिरवळीने नटणाऱ्या धरतीचे पूर्वापार चालत आलेले एक जिव्हाळ्याचे नाते आहे.हे नाते असेच कायम टिकून राहणार आहे. ते भविष्यातही तसेच कायमस्वरूपी राहणार आहे. फक्त गरज आहे माणसाने वेळीच सावध होण्याची. आपल्या लाडक्या व सुंदर पृथ्वीला प्रदूषणापासून वाचविण्याची. हिरवळीने नटलेल्या पृथ्वीला प्लॅस्टिकच्या विळख्यातून बाहेर काढण्याची!

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**

# गुरूंचे जीवनातील महत्व !

भारतीय संस्कृती ही पृथ्वीतलावरील सर्वात प्राचीन आणि महान संस्कृती मानली जाते. आज जगभरात भारताला जो मान सन्मान आहे तो येथील संस्कृती आणि परंपरांमुळे. काळाच्या ओघात जगातील अनेक संस्कृती लोप पावल्या. भारतावरही अनेक सांस्कृतिक आक्रमणे झाली आणि होत आहेत मात्र पुरातन भारतीय संस्कृती त्याही स्थितीत टिकून आहे. दिवसागणिक तिचे महत्व वाढत आहे. येथील कुटुंबव्यवस्था, येथील नैतिक मूल्ये, धार्मिक रूढी परंपरा, सांस्कृतिक ठेवा, ग्रंथ संपदा, सण-उत्सव, पुरातन मंदिरे आणि वास्तू, येथील ऋषी-मुनींचे संशोधन, त्यांनी हजारो वर्षांपूर्वी घालून दिलेली शिकवण यांचे आकर्षण आज पाश्चात्यांनाही आहे. त्यामुळे येथील संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी आणि ती अनुभवण्यासाठी दरवर्षी लाखो संशोधक आणि पर्यटक हजारो किलोमीटरचा प्रवास करून भारतात येत असतात. असे म्हणतात भारताचे एका वाक्यात वैशिष्ट्य सांगायचे म्हटल्यास येथील 'गुरु-शिष्य परंपरा' असेच सांगता येईल. आजतागायत या भूमीत गुरु-शिष्याची अनेक उदाहरणे होऊन गेली ज्यांची नावे इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेली. गुरूंनी आपल्या शिष्याला सर्वोत्तम घडवण्यासाठी घेतलेली मेहेनत आणि गुरूंना भगवंताच्या स्थानी मानून शिष्याने केलेली गुरूंची सेवा आणि त्यांचे आज्ञापालन यांच्या कथा आजच्या पिढीला प्रेरणा आणि संजीवनी देतात. गुरूंचे दोन प्रकार आहेत. जे व्यावहारिक ज्ञान देऊन भौतिक प्रगती घडवून आणतात ते व्यावहारिक गुरु. आपल्या आयुष्यात असे अनेक गुरु मिळतात जे आपल्याला मार्गदर्शन करून व्यवहारातील अनेक प्रतिकूल प्रसंगातून सोडवतात तर दुसरे म्हणजे आध्यात्मिक गुरु जे तुमची आध्यात्मिक प्रगती घडवून आणून तुम्हाला जन्म मृत्यूच्या चक्रातून सोडवतात म्हणजेच आत्म्याचे परमात्म्याशी मिलन घडवून आणतात. हे तुम्हाला साधना सांगून ती तुमच्याकडून ती करवून घेतात. हे तुमच्या प्रापंचिक अडचणी सोडवत नाहीत कारण या अडचणी तुमच्या गत जन्मीच्या कर्मांमुळे आलेल्या असतात आणि त्या या जन्मात भोगल्या नाहीत तर त्यासाठी दुसरा जन्म घ्यावा लागेल हे तुमच्या मनावर बिंबवतात. या अडचणींकडे साक्षीभावाने कसे पाहायचे हे ते शिकवतात. ८४ लक्ष योनीचा फेरा पार पडल्यानंतर मनुष्य जन्म मिळतो. त्यामुळे या जन्मात साधना करून मनुष्याने भगवंताची प्राप्ती करणे म्हणजेच जन्म मृत्यूच्या चक्रातून मुक्त होणे अपेक्षित असते; मात्र मनुष्यावर असलेल्या गतजन्मीच्या संस्काराच्या प्रभावामुळे तो मायेच्या अधीन राहून सुखात रममाण होतो, परिणामी त्याला त्याच्या ध्येयाचा विसर पडतो. हे ध्येय लक्षात आणून देण्याचे कार्य गुरु करत असतात. गुरु साधकांकडून साधना करवून घेतात आणि त्याला शिष्याच्या अवस्थेत आणतात. एकदा शिष्यावस्था प्राप्त झाली की गुरु त्याला पुढच्या टप्प्याची साधना सांगतात, त्याला मोक्षाची वाट दाखवतात. गुरूंच्या आज्ञेचे तंतोतंत पालन करणारा शिष्य मानवी जन्माचे सार्थक करत. व्यावहारिक जीवनात अडचणींना सामोरे जाण्याचे बळ गुरु देतात त्यामुळे गुरूंचे जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. गुरु-शिष्याचे अनोखे नाते असते. गुरूंच्या आज्ञेपुढे शिष्याला कशाचीही किंमत कळत नाही आणि आपल्या शिष्याची आध्यात्मिक प्रगती होत नाही तोपर्यंत गुरूंनाही चैन पडत नाही. गुरु शिष्याची भगवंताशी म्हणजेच सुख दुःखाच्या पलीकडील आनंदाशी भेट घडवून आणतात म्हणून शिष्याला गुरु हे सदैव देवाच्या स्थानी असतात.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## अवकटी

गठ बंधन करताना
नकोशर्ती अन् अटी
जोडायचे काळजीने
ठेऊ नये मुळी फटी

अपेक्षांची भाऊगर्दी
कधी वाढे लठ्ठालठ्ठी
जाणीव पूर्वक द्यावी
द्वेष भावा सोडचिठ्ठी

राज्य नवे सुरू करा
नवा दांडू नवी विटी
आठवण जखम भरे
नका काढू सालपटी

सल्लामसलत करता
बुध्दी न ठेवावी थिटी
वाढबुवा अन्न कसेही
माझेच ताट नि वाटी

किंतुपरंतु मनात हेतू
मारतअसताना मिठी
जमलाडाव बिघडतो
होवू जाय मगरमिठी

एकदासगळे ठरवता
परतमारू नये पलटी
बंद खोली भरकटली
चर्चाचाले उल्टीसुल्टी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**
www.kavyakusum.com

# स्वत:च्या देहबोलीवर लक्ष द्या !

खूप वेळा आपण इतके स्वमग्न होतो की आपले भान हरपून जाते. लक्ष केंद्रित न झाल्यामुळे अनेक समस्या, संकटे आणि वाईट परिणाम आपल्याला जीवनात सतत भोगावे लागतात. मन सतत विचारमग्न असणे खूपच धोकादायक आहे. विचार थांबवून 'शून्य विचारावस्था' गाठणे हे खरंच एक मानसिक व्यायाम आहे.

मनाची एकाग्रता साधण्यासाठी प्राणायाम, ध्यानधारणा यांसारख्या अनेक पद्धती विकसित झाल्या आहेत आणि त्या खरोखरच लाभदायक ठरतात. त्याचबरोबर, आपल्या देहबोलीवर लक्ष देणे ही देखील एकाग्रता साधण्याचा व व्यक्तिमत्त्व विकासाचा एक सुंदर पर्याय आहे.आपण विविध माध्यम द्वारे आपले विचार, भावना आणि प्रतिक्रिया व्यक्त करत असतो. यासाठी भाषा – म्हणजेच मौखिक संवाद – सर्वाधिक वापरली जाते. मात्र, आपल्या देहबोलीतूनही आपण समोरच्याला अनेक गोष्टी सांगत असतो. खूप वेळा लक्ष विचलित झाल्यास आपण तोंडाने काही बोलतो आणि देहबोली मात्र वेगळीच असते. उदाहरणार्थ, एखाद्याचे गुणगौरव करताना आपण म्हणतो, हे पाहून मला खूप आनंद झाला! पण त्या वेळी चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत नसेल, तर समोरच्याला आपले बोलणे नाटकी वाटते. आपला खोटेपणा देहबोलीतून उघड होतो.

मातृभाषेतून बोलणे आपण सभोवतालच्या लोकांचे ऐकून नकळत शिकत जातो. त्याचप्रमाणे देहबोली आपण अनुकरणातून शिकतो. त्यात सततच्या वापरातून काही चुकीच्या सवयी तयार झालेल्या असतात, तर काही देहबोली आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रतिकूल असते. त्यामुळे देहबोली



जाणीवपूर्वक शिकून घेतली पाहिजे.

डोळे हे नेहमी आपले व्यक्तिमत्त्व प्रकट करत असतात. समोरच्याच्या डोळ्यांत खोलवर पाहिल्यानंतर त्याचा स्वभाव, भावना आणि खोटेपणा ओळखता येतो. त्यामुळे आपण लोकांसमोर किंवा बोलताना डोळे मिचकावणे, भुवया उडवणे टाळले पाहिजे.

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

डोळ्यांमधून आपल्या सुसंस्कृतपणाचे दर्शन घडते. त्यामुळे समूहामध्ये वावरताना डोळ्यांचा सावधपणे वापर केला पाहिजे. समोरच्या व्यक्तीच्या डोळ्यांत डोळे घालून बोलल्यास आपला आत्मविश्वास दिसून येतो.

चेहरा नेहमी प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला पाहिजे. कारण आपली प्राथमिक ओळख म्हणजे आपला चेहरा असतो. सतत चेहऱ्यावर तणाव दिसल्यास लोक आपल्याजवळ येण्याचे टाळतात. चेहऱ्यावरील हास्य, प्रेम, आपुलकी आणि करुणा हे भाव खऱ्या अर्थाने मनापासून व हृदयापासून उमटले पाहिजेत. ते जाणीवपूर्वकही विकसित करता येतात आणि सहजतेनेही निर्माण होऊ शकतात. त्यासाठी चेहऱ्यावर योग्य भाव जाणीवपूर्वक निर्माण करता आले पाहिजेत.

चालताना आणि बोलताना हातांचा वापर आपण करत असतो. हातवारे करताना आपल्यातील आत्मविश्वास, परखडपणा आणि निर्धार प्रकट करण्यासाठी हातांचा ताकतीने वापर केला पाहिजे. बोलताना आपल्या मनगटातील जोर दिसला पाहिजे. हातवारे नेबळटपणे करणाऱ्यांचे लोक सहसा गांभीर्याने ऐकत नाहीत.कधी काही गर्विष्ठ लोक आपल्या बोटातील सोन्याच्या अंगठ्या दाखवण्यासाठी मुद्दाम हातवारे करतात. अशा नाटकीपणाने हातवारे करणाऱ्यांचे खोटेपण हुशार माणसांना लगेच समजते.शरीराच्या प्रत्येक अवयवाचा उपयोग आपण स्वतःला समाजासमोर प्रकट करत असताना करतो. त्यामुळे त्या शरीरभागांचा वापर करताना सजगता, नैसर्गिकता आणि कल्पकता ठेवणे महत्त्वाचे असते.

शेवटी, ये जो पब्लिक है, सब जानती है! या गीताच्या ओळीप्रमाणे लोक आपल्याला पूर्ण ओळखत असतात. म्हणून खोटा आव आणून उगाच छाती फुगवून चालणे टाळले पाहिजे. चेहरा नेहमी गंभीर, उग्र किंवा रागीट ठेवणे टाळले पाहिजे. समोरच्याचे मन:पूर्वक ऐकले पाहिजे आणि त्यावर नैसर्गिक प्रतिसाद दिला पाहिजे. समोरच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करणे किंवा गांभीर्य न राखणे यातून आपला बेजबाबदारपणा प्रकट होतो.

आपल्या देहबोलीवर लक्ष देणे हे केवळ संवाद कौशल्याचा भाग नसून एक अत्यंत महत्त्वाचे आत्मभान आहे. हे केवळ इतरांवर प्रभाव टाकण्यासाठी नसून, स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी आवश्यक आहे. आपण कोण आहोत, काय अनुभवतो आणि जगाशी कसे वागतो – हे सर्व आपल्या देहबोलीतून उमटत असते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# कोरेवाडी ते यमरगवाडी रस्ता नसल्याने शालेय विद्यार्थ्यांचे हाल !

## ओढ्यावर पूल नसल्याने वाहत्या पाण्यातून शाळेची जीवघेणी पायपीट

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०६, धाराशिव :** तुळजापूर तालुक्यातील यमगरवाडी (मंगरुळ) येथील एकलव्य विद्या संकुल मध्ये शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या कोरेवाडी तील शालेय विद्यार्थ्यांची पावसामुळे वाटेतील हरणा नदीला पाणी आल्याने व पायवाटेने जाताना काटेरी झाडेझुडपे वाढल्याने कोरेवाडीतील यमगरवाडी विद्या संकुलात शिक्षण घेणाऱ्या ३० विद्यार्थ्यांनी दुसऱ्या शाळेत शिक्षणासाठी गेले. कोरेवाडी ते यमगरवाडी अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या असणाऱ्या शाळेसाठी बस नसल्याने चांगलीच परवड होत आहे.



या कोरेवाडीतील विविध घटकांतील ४३ विद्यार्थी यमगरवाडी येथील नामांकित एकलव्य विद्या संकुलामध्ये शिक्षणासाठी जातात. परंतु शाळेला जाणारी वाट काटेरी झुडपाने, चिखलय झाल्याने त्यांना पाण्यातून वाट शोधावी लागतेय. पावसाळ्यात पाऊस झाल्याने जवळपास दोन ते तीन महिने पालक आपल्या पाल्यांना शाळेत पाठवत नाहीत. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

कोरेवाडी ते यमगरवाडी वाटेवरील ३ किलोमीटर अंतरावरील दिड किलोमीटर अंतरावर डांबरीकरण झाले आहे. दिड किलोमीटर व वाटेतील पूलाचे काम रखडल्याने येथील विद्यार्थांना कोरेवाडीहून कुंभारी, मंगरुळ, कसई मार्गे यमगरवाडी शाळेत जवळपास १५ ते २० किलोमीटर अंतर कापून बसने यावे लागते. या त्रासामुळे यमगरवाडी शाळेतील ३० विद्यार्थ्यांनी दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतला आहे.

यापूर्वी कोरेवाडीतील नागरिकांनी या रस्त्यासाठी प्रयत्न केले. परंतु रस्ता झाला नाही. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून या विद्यार्थ्यांची ने-आण करण्यात पालकांची चांगलीच दमछाक होत आहे. कोरेवाडील विद्यार्थ्यांना यमगरवाडी येथील शाळेत सुरक्षितपणे जाणे येणे साठी या मार्गावरील रस्त्यासाठी लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून रस्त्याचे काम करण्याची मागणी पालक वर्गातून होत आहे.

## बी. जे. एस. महाविद्यालयाचे राष्ट्रीय छात्र सेना बी आणि सी प्रमाणपत्र परीक्षेत उज्वल यश

**अक्षराज : भुषण बावचीकर**

**दि.०५, वाघोली (पुणे) :** महाराष्ट्र नेव्हल एनसीसी) पुणेच्या वतीने शैक्षणिक २०२४-२५ या वर्षासाठी बी आणि सी प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात आली, बी. जे. एस. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) युनिटमधील विद्यार्थ्यांनी नुकत्याच पार पडलेल्या बी आणि सी प्रमाणपत्र परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या परीक्षेमध्ये महाविद्यालयातील १९ बी प्रमाणपत्र आणि ११ सी प्रमाणपत्र अशा एकूण ३० छात्र सैनिकांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन विशेष यश संपादन केले. या यशाबद्दल भारतीय जैन संघटनेचे शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाचे व्यवस्थापक सुरेशजी साळुंके यांनी विद्यार्थ्यांचे आणि प्रशिक्षकांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, हे यश महाविद्यालयाच्या एन.सी.सी. युनिटच्या उत्कृष्ट कार्यप्रणालीचे द्योतक आहे. या कार्यक्रम निमित्त

महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. संजय गायकवाड, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.संतोष भंडारी, इतिहास विभाग प्रमुख डॉ. भूषण फरतडे, एनसीसी विभाग प्रमुख सब लेफ्टनंट डॉ.शिवाजी सोनवणे तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांनचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. बी जे. एस. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) युनिटमधील विद्यार्थ्यांनी बी आणि सी प्रमाणपत्र परीक्षेत मिळवलेल्या उज्वल यशानिमित्त आयोजित कौतुक सोहळ्यात भारतीय सेनेतील निवृत्त आणि कारगिल युद्धातील नायक कॅप्टन गाडेकर बी. एम. आणि नायब सुभेदार बावचीकर बी. डी. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



कॅप्टन गाडेकर बी. एम.त्यांनी आपल्या मनोगतात एन.सी.सी.चे युवकांच्या जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, एन.सी.सी. ही केवळ एक गणवेशातील संस्था नाही, तर ती शिस्त, नेतृत्व आणि देशप्रेम यांचे प्रतीक आहे. तुम्ही आज येथे मिळवलेले यश हे तुमच्या भविष्यातील मोठ्या जबाबदाऱ्यांचा पाया आहे. त्यांनी कारगिल युद्धातील आपले अनुभव सांगितले, ज्यात त्यांनी शत्रूच्या आव्हानांना सामोरे जाण्याचे धैर्य आणि सामूहिक कार्याचे महत्त्व यावर भर दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना देशसेवेसाठी नेहमी तयार राहण्याचा सल्ला दिला.नायब सुभेदार बावचीकर बी. डी.त्यानी कारगिल युद्धातील कठीण परिस्थिती आणि सैनिकांच्या बलिदानाची आठवण करून दिली. एन.सी.सी. तुम्हाला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम बनवते. तुम्ही आज जे शिकता आहात, ते तुम्हाला आयुष्यभर मार्गदर्शन करेल, असे ते म्हणाले. त्यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम, शिस्त आणि देशाप्रती निष्ठा यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या प्रेरणादायी अनुभवांनी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण केला. बी. जे. एस. महाविद्यालयाच्या एन.सी. सी. विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या मेहनतीचे, प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आणि महाविद्यालयाच्या उत्कृष्ट शैक्षणिक वातावरणाचे फलित आहे. हे यश विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी प्रेरणा देणारे ठरेल. यशस्वी विद्यार्थ्यांनी आपला आनंद व्यक्त करताना सांगितले की, एन.सी. सी.च्या प्रशिक्षणाने त्यांच्यात आत्मविश्वास, शिस्त आणि देशसेवेची भावना निर्माण झाली. हा कौतुक सोहळा बी. जे. एस. महाविद्यालयाच्या एन.सी. सी. युनिटसाठी एक अविस्मरणीय क्षण ठरला. कॅप्टन गाडेकर बी. एम. आणि नायब सुभेदार बावचीकर बी. डी. यांच्या उपस्थितीने आणि प्रेरणादायी मनोगताने विद्यार्थ्यांमध्ये नवीन ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण झाली. हे यश आणि हा सोहळा महाविद्यालयाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवला जाईल.

## 'आषाढी एकादशीनिमित्त' प्राथमिक शाळेत भव्य बाल दिंडीचे आयोजन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०५, विंचूर (नाशिक) :** आषाढी एकादशीनिमित्त येथील कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक शाळेच्या वतीने भव्य बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले. या धार्मिक-सांस्कृतिक उपक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते. प्रथम पालखीचे पूजन विद्यालयाच्या सन्माननीय मुख्याध्यापिका नीलिमा शिरसाठ यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी भक्तिभावाने विठुरायाचे नामस्मरण केले. पांढरे शुभ्र कपडे, फेटे, गळ्यात टाळ, हातात भगवे झेंडे अशा पारंपारिक वेशात मुले आणि मुले सजले होते. याप्रसंगी चि. प्रथमेश पाटील यांने विठुरायाची तर देवयानी चव्हाण हिने रुक्मिणी यांची सुंदर अशी वेशभूषा



केली होती.

दिंडीच्या सुरुवातीला शाळेच्या प्रांगणात गोल रिंगण करून विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी विठुरायाच्या अभंगावर ठेका धरला. रिंगणाचे नयन रम्य दृश्य डोळ्याचे पारणे फेडणारे होते. पारंपरिक वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगांच्या गजरात वज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात हरिनाम संकीर्तन करत गावातील मुख्य रस्त्यावरून दिंडी फेरी काढली. विद्यार्थ्यांच्या उत्साहाने भरलेल्या भक्तिमय वातावरणाचे हे दृश्य मनाला भारावून टाकणारे होते. ठीक ठिकाणी ग्रामस्थांनी व पालकांनी दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत केले.

मुख्याध्यापिका नीलिमा शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका वर्षा पवार, वैशाली सदाफळ, उर्मिला जगताप, लक्ष्मण गायकर, संजय त्रिभुवन या शिक्षकांनी दिंडीचे उत्कृष्ट नियोजन केले होते. गावकरी, पालकवर्ग तसेच विविध मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक परंपरा, भक्तीभावना व सामाजिक एकता यांचे महत्त्व दृढ झाले.

## ठाणे सिव्हिल रुग्णालयात प्रथमच तरुणावर गायनिकोमॅस्टिया रिडक्शन व 'लिपोसक्शन' शस्त्रक्रिया यशस्वी

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०५ ठाणे :** किशोरवयीन मुलामध्ये हार्मोनल बदलांमुळे छातीवर स्तनासारखा फुगवट गायनिकोमॅस्टिया निर्माण होणे ही एक नैसर्गिक पण मानसिकदृष्ट्या त्रासदायक अशी स्थिती असते. ही शस्त्रक्रिया खासगी रुग्णालयात करणे खर्चिक असते. सिव्हिल रुग्णालयात एका २० वर्षीय तरुणाची प्रथमच कठीण गायनिकोमॅस्टिया रिडक्शन आणि लिपोसक्शन शस्त्रक्रिया यशस्वी रित्या पार पडली आहे.

ऐरोली येथील रहिवासी २० वर्षीय तरुणाच्या छातीवर हार्मोनस वाढून स्तनासारखे गायनिकोमॅस्टिया याने त्रस्त झाला होता. शाळा महाविद्यालयात जाताना काही वेळा चर्चेचा विषय बनायचा.खाजगी रूग्णालयात यावर उपचार करणे कुटुंबासाठी खर्चिक होते. त्यामुळे



सिव्हिल रूग्णालयात संपर्क करून याची शस्त्रक्रिया होईल अशी माहिती समजली. यानुसार संबधित तरूणाला रूग्णालयात दाखल केल्यानंतर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धीरज महागडे, वरिष्ठ सर्जन डॉ.शशिकांत रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित तरूणावर गायनिकोमॅस्टिया रिडक्शन शस्त्रक्रिया पार पडली असल्याची माहिती प्लास्टिक सर्जन डॉ.अभिषेक धाकड यांनी दिली. साधारण दीड तास शस्त्रक्रियेसाठी लागला.

सुरूवातीला संबंधित तरूणाची हार्मोनल तपासणी, सोनोग्राफी व छातीचे एक्स रे घेण्यात आले त्यानंतर गायनिकोमॅस्टिया रिडक्शन आणि लिपोसक्शन शस्त्रक्रिया करण्यात आली. गायनिकोमँस्टीया ही टाळता येणारी स्थिती नसली तरी वेळेत निदान व योग्य उपचाराद्वारे ती सहज बरी होऊ शकते. पालकांनी याकडे गांभीर्याने पाहून मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करावा. संबंधित तरूणावर मोफत शस्त्रक्रिया करून ठाणे सिव्हिल रूग्णालयाने आणखीन एक सामाजिक भान जपणारे पाऊल उचलले आहे असे डॉ.कैलास पवार यांनी सांगितले.

# थोडक्यात

## दारूच्या नशेत ११२ नंबर डायल करून पोलिसांना वारंवार खोटी माहिती देणाऱ्यावर गुन्हा दाखल

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०५, विंचूर (नाशिक) :** लासलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मद्यधुंद अवस्थेत असलेल्या तरुणांचा उद्रेक आला अंगी कोणत्याही घटनेची तात्काळ पोलिसांना सूचना देण्यासाठी ११२ नंबर दिला आहे. मात्र हा नंबर सुद्धा पोलिसांसाठी डोकेदुखी ठरत आहे. लासलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवनाथ बाळू मोकळ राहणार नांदगाव ता. निफाड, जि.नाशिक येथील दारुच्या नशेत असलेल्या तरुणाने ११२ नंबर वर वारंवार फोन करून, खोटे वृत्त दिले. तातडीने घटनास्थळी पोहोचलेले पोलिसांना सदर माहिती पूर्णपणे खोटी असल्याचे निदर्शनास आले. आणि तपासाअंती असे उघड झाले. त्यानंतर लासलगाव पोलिसांनी घटनेचा तपास करून सदर इसमाविरोधात सार्वजनिक यंत्रणेचा गैरवापर व खोटी माहिती देण्याचा गुन्हा दाखल केला आहे या प्रकाराचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनास खाली सुरू आहे.

## भारती विद्यापीठ बाल विकास मंदिरात बालगोपाळांची दिंडी

**अक्षराज : साहेबराव परबत**



**दि.०५, सोलापूर :** 'आषाढी एकादशी' निमित्त 'दिंडी सोहळा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी वारकरी वेशभूषेत टाळ, पताका, तुळशी वृंदावन घेऊन दिंडी सोहळ्यास उपस्थित होते. यावेळी आकर्षक रांगोळी काढून पालखी सजवून श्री विठ्ठलाच्या भक्तीगीताने भक्तीमय वातावरण निर्मिती करण्यात आली होती.

पालखीचे पूजन ग. सा पवार प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका व्ही. डी. गोळे व बालविकास विभागाच्या मुख्याध्यापिका. वैशाली मोहोळे यांच्या हस्ते करण्यात आले. पालखी पूजेनंतर नंतर शिक्षिकांनी भजन म्हटले. 'पांडुरंग पांडुरंग' 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' हा जयघोष करण्यात आला. हि बालचमुंची दिंडी शाळेच्या प्रांगणातच काढण्यात आली होती.

विठ्ठलाच्या वेशभूषेत मोठा गट - पूर्वा मधील चि. जुजगार रुद्र अमित. आणि रुक्मिणीच्या मोठा गट - चित्रांमधील कु. घोडके वेदिका विकास. हे विद्यार्थी आले होते. विठ्ठल व रुक्मिणीच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे बालविकासच्या मुख्याध्यापिका. वैशाली मोहोळे यांनी श्रीफळ आणि गुलाबाचे फुल देऊन कौतुक केले. या दिंडी सोहळ्यात पालक बंधू - भगिनी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

हा दिंडी सोहळा मुख्याध्यापिक. वैशाली मोहोळे यांच्या मार्गदर्शनाने तसेच ज्येष्ठ शिक्षिका. वैशाली शिंदे, संतोषी शेंडे, दीपा तोटद, भाग्यशी म्हेत्रे, भाग्यशी शिरसीकर, वृषाली इनामदार तसेच लेखनिक अनिल माने, सेविका गौराबाई हलसंगी, प्राजक्ता मोकाशी यांच्या सहकार्याने भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांना खाऊ देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## एकंबा येथील कानोबा देवस्थानच्या जमिनीवर अतिक्रमण

### ग्रामपंचायतीकडून ठराव, तहसीलदारांकडे तक्रार

**अक्षराज : लक्ष्मण शेन्नेवाड**

**दि.०५, हिमायतनगर :** तालुक्यातील मौजे एकंबा येथील कानोबा देवस्थानच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत ग्रामपंचायतीने यासंदर्भात ठराव पारित केला असून, अतिक्रमण हटवण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला आहे.

याबाबत ग्रामस्थांच्या वतीने मा. तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात, कानोबा देवस्थानच्या मालकीच्या जमिनीवर बेकायदेशीररित्या अतिक्रमण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून, तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सदर देवस्थानाची जमीन धार्मिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची असून, तिच्यावर अतिक्रमण होणे म्हणजे भाविकांच्या श्रद्धेवर घाला असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

ग्रामपंचायतीने या प्रकरणी ठराव घेऊन तहसीलदारांकडे अतिक्रमण हटविण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून लवकरात लवकर योग्य ती कारवाई होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## अवैध शस्त्रसाठा बाळगणारा इसम पोलिसांच्या जाळ्यात

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०५, जुलै (कल्याण) :** अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग), पोलीस उप आयुक्त (परिमंडळ ३) आणि सहायक पोलीस आयुक्त (कल्याण विभाग) यांच्या आदेशानुसार, पोलिस ठाणे हद्दीत अवैध धंदे करणाऱ्यांवर, विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्यांवर, अंमली पदार्थांचा साठा व विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.

या आदेशाच्या पार्श्वभूमीवर, खडकपाडा पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला दिनांक ०३ जुलै २०२५ रोजी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, गौरीपाडा परिसरात एक इसम अग्निशस्त्रासह येणार आहे. सदर माहिती स.पो.नि. विजय गायकवाड यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे यांना कळवली. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार, खातरजमा करून आवश्यक कारवाईचे निर्देश दिले.

त्यानुसार स.पो.नि. विजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने गौरीपाडा, कल्याण (प.) येथे सापळा रचला. काही वेळातच गुप्त माहितीनुसार एक इसम संशयास्पदरीत्या फिरताना दिसल्याने त्याला त्वरित ताब्यात घेण्यात आले. कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून पंचांच्या उपस्थितीत त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडे बेकायदेशीररीत्या बाळगलेले अग्निशस्त्र सापडले.

अटक करण्यात आलेल्या इसमाचे नाव सनी कुमार विजय पाल उर्फ चौहान (वय १९ वर्षे, रा. बाबडी म्हात्रे चाळ, रूम नं. ०२, मिलिंद नगर, कल्याण (प.) जि. ठाणे) असे आहे.

खडकपाडा पोलिसांनी या कारवाईतून समाजविघातक कृती करणाऱ्या तत्वांना कडक इशारा दिला आहे. पुढील तपास सुरू असून आरोपीविरोधात योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

# थोडक्यात

## गरजू होतकरू विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, मुंबई :** दिनांक ०५ जुलै २०२५ रोजी मानखुर्द येथे संकल्प संस्था आणि आरिन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच संकल्प संस्थाचे अध्यक्ष विनोद हिवाळे यांच्या पुढाकाराने आरीन फाऊंडेशनचे अध्यक्ष नितेश मिसाळ यांच्या माध्यमातून एम/पूर्व मानखुर्द विभागातील गरजू होतकरू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप करण्यात आले. संकल्प संस्था गेली १२ वर्षापासून चेंबूर गोवंडी शिवाजी नगर मानखुर्द या एम/पूर्व विभागात वस्ती विकास प्रकल्प अंतर्गत शैक्षणिक आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि वस्ती संघटन या विषयावर कार्य करीत आहे.

त्याचाच महत्वाचा एक भाग म्हणून संकल्प संस्था दर वर्षीप्रमाणे आरिन फाउंडेशन यांच्या मदतीने यावर्षी या दोन्ही संस्थेच्या माध्यमातून गरजवंत कुटुंबातील गरजू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग चे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे संकल्प संस्था मधून सविता हेंडवे आणि आरिन फाउंडेशन कडून किरण जाधव यांनी समन्वयक म्हणून कामकाज पाहिले. वनिता सावंत यांनी वस्ती पातळीवर असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबातील मुलांबरोबर नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी केली. संकल्प संस्थेचे अध्यक्ष विनोद हिवाळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शैक्षणिक विषयावर मोलाचे मार्गदर्शन आणि भविष्यासाठी होणाऱ्या कार्यक्रमाबद्दल चर्चा केली. तसेच संकल्प संस्थेच्या सचिव सविता हेंडवे यांनी एम पूर्व विभागा मधील वस्ती विकास प्रकल्प अंतर्गत वस्तीमध्ये होणार्या होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संकल्प संस्थेचे दीपा गमरे, प्रतिभा सुतार, उमा चंदनशिवे यांचे विशेष सहकार्य लाभले.

## टाकळीढोकेश्वर ग्राम दक्षता समितीच्या अध्यक्षपदी नारायण झावरे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामपंचायत पातळीवर सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रेशन दुकानातून वितरित करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तूवर देखरेख ठेवण्यासाठी अध्यक्ष, सचिव अशा अशासकीय पद असलेल्या दक्षता समिती स्थापन करण्यात आली. समितीमध्ये विविध कार्यकारी सोसायटी, तीन महिला प्रतिनिधी, विरोधी पक्षाचा सदस्य, अनुसूचित जाती प्रतिनिधी, अनुसूचित जमाती प्रतिनिधी व एक सामाजिक कार्यकर्ता इत्यादींचा नुकताच समावेश आहे. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल स्वस्त धान्य दुकान ग्राम दक्षता समितीच्या अध्यक्षपदी टाकळी ढोकेश्वर येथिल विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन नारायण यशवंत झावरे तसेच गंगाधर रखमाजी बांडे यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड झाली आहे. सचिवपदी ग्राम महसूल अधिकारी व्हि.एन.जाधव यांची निवड झाली. या समितीमध्ये सदस्य म्हणून टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतच्या सरपंच अरुणा प्रदीप खिलारी, ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवाजी सिताराम खिलारी, पत्रकार वसंत भानुदास रांधवण, सामाजिक कार्यकर्ते संजय शिवाजी झावरे, महिला प्रतिनिधी,माजी ग्रामपंचायत सदस्या चित्रा संतोष बांडे, ग्रामपंचायत सदस्या सुग्राबी कादर हवालदार, अनुसूचित मागासवर्गीय प्रतिनिधी म्हणून शिला आनंदा आल्हाट, स्वस्त धान्य दुकानाचे सेल्समन विलास गुलाब नाईकवाडी यांची सेवा सोसायटीच्या वतीने ग्रामसभेत बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

## कलाशिक्षक संतोष क्षिरसागर यांनी रेखाटले मातीच्या विटेवर पांडुरंग



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** सध्या आषाढीनिमित्त केवळ पंढरीच नाहीतर संपूर्ण महाराष्ट्र सज्ज झाला आहे. आषाढी एकादशीला पांडुरंगाच्या चरणी प्रत्येकालाच माथा टेकवण्याचा योग येत नाही.

पण प्रत्येक व्यक्ती या ना त्या मार्गाने पांडुरंगाची सेवा मात्र नक्की करतो. पारनेर तालुक्यातील वासुंदे येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचे कलाशिक्षक संतोष पांडुरंग क्षीरसागर त्यापैकीच एक, त्यांनी कुंचल्यातून त्यांची भक्ती सादर केली आहे. मातीच्या बांधकामाच्या विटेवर संतोष क्षिरसागर यांनी त्यांच्या मनातले पांडुरंग रेखाटले आहेत. ज्याची आपण आतुरतेने वाट पाहत होतो.तेच आपले स्वप्न पूर्ण होत आहे. बरेच जण पंढरपूर पायी चालत दिंडीला जाऊन हा ऐतिहासिक सोहळा याची देही याची डोळा बघतीलही परंतु सगळ्यांनाच शक्य होईल असे नाही. म्हणून इथेच शाळेत राहून आपल्या कलेच्या माध्यमातून त्यांनी पांडुरंगाला साक्षात पाहिलं नसलं तरी या विटेवरचे पांडुरंगच त्यांना भेटलेले आहेत. सुंदर लिखाणाद्वारे तसेच उत्कृष्ट चित्रकलेद्वारे क्षिरसागर हे परिसरातील गावोगावी परिचित झाले असून त्यांच्या या चित्रकला, हस्ताक्षर रेखाटन कलेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दरम्यान, संतोष क्षिरसागर यांनी आपल्या अंगी असलेली कला जोपासत नेहमीच सामाजिक, वैचारिक विषयांनाही अतिशय महत्व दिले आहे. कलेच्या माध्यमातून क्षिरसागर हे समाज सेवा करत आहेत. नारायण महाराज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली क्षिरसागर यांनी अडीच वर्षे लिखाण करून ज्ञानेश्वरी ग्रंथ हस्तलिखित लिहिला आहे. संतोष क्षिरसागर यांनी आजवर बऱ्याच प्रकारच्या पेंटिंग केल्या आहेत. पिंपळाच्या पानावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा, आंब्याच्या पानावर, रुईच्या पानावर हनुमानाच अश्या बऱ्याच झाडांच्या पानांवर त्यांनी पेंटिंग केले आहेत.त्याच सोबत क्षिरसागर यांनी आपल्या हस्तकौशल्याच्या माध्यामातून अनेक कलाकृती तयार केल्या आहेत. कलेची आवड असल्यामुळे नेहमीच काही तरी नवीन करण्याची उर्मी त्यांच्यामध्ये असते. भाऊसाहेब महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, वासुंदे गावचे सरपंच झावरे, माजी उपसरपंच शंकर बर्वे व सर्व शिक्षक वृंद यांनी क्षिरसागर यांचे विशेष कौतुक केले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व व्यसंगी व बहुआयामी होते - सरन्यायाधीश गवई



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०५, मुंबई :** विविध विषयांचे अभ्यासक व तज्ञ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व विधीतज्ञ, अर्थतज्ञ, समाजशास्त्रज्ञ असे बहुआयामी होते. शिक्षण क्षेत्रातील बहुमोल योगदानाबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अध्यापन कारकीर्दही मोलाची आणि प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.शासकीय विधी महाविद्यालय येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्राध्यापक आणि प्राचार्य, कारकीर्दीला ९० वर्षे पूर्ण झाल्या निमित्त स्मृतीपटलाचे अनावरण आणि सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती मनिष पितळे, महाधिवक्ता बिरेंद्र सराफ व प्राचार्या डॉ.अस्मिता वैद्य हे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर व जीवनावर आधारित चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. शासकीय विधी महाविद्यालयाच्या वतीने मानपत्र देऊन सरन्यायाधीश भूषण गवई यांचा गौरव करण्यात आला. विविध संस्था तसेच मान्यवरांनीही यावेळी सरन्यायाधीश गवई यांचा गौरव केला.सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व व्यासंगी व बहुआयामी होते. ते एक उत्कृष्ट शिक्षक असल्याने त्यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबरोबरच त्यांची अध्यापन कारकीर्दही प्रेरणादायी ठरले. शासकीय विधी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करीत असतानाच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील दुर्बल घटकांवरील अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य सुरू केले.१९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया या ॲक्टमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मोलाचे ठरले.

शासकीय विधी महाविद्यालयाला देदीप्यमान शैक्षणिक वारसा लाभला असून अनेक विधीज्ञ या महाविद्यालयातून घडले. महाविद्यालयाच्या विविध समित्यांचे वैशिष्ट्यपूर्ण कार्यही अभिनंदनीय आणि अनुकरणीय असल्याचे गौरवोद्गार श्री गवई यांनी काढले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य केले त्या ठिकाणी गौरव होणे व शासकीय विधी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्याचा सार्थ अभिमानाचे असल्याचेही श्री गवई यांनी नमूद केले. प्राचार्य अस्मिता वैद्य प्रास्ताविकात म्हणाल्या, शासकीय विधी महाविद्यालयाला देदीप्यमान शैक्षणिक वारसा लाभला असून अनेक नामवंत विधीज्ञ या महाविद्यालयाने घडविले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून १९३५ मध्ये अध्यापन कारकीर्दीस सुरुवात केली. न्यायशास्त्रासारख्या अत्यंत गहन विषयाचे अध्यापन डॉ आंबेडकर करीत असत. या महान कार्याला ९० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गौरवार्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विधी सेवा क्षेत्रात महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचेही वैद्य यांनी सांगितले.या कार्यक्रमास सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती हेमंत गोखले, न्यायाधीश रेवती ढेरे, न्यायाधीश नीला गोखले, कुलगुरू डॉ. दिलीप उके, कुलगुरू डॉ.हेमलता बागला, कुलगुरू डॉ.अपूर्वा पालकर, कुलगुरू डॉ.गोसावी, प्रधान सचिव सुवर्ण केवले, सिनियर कौन्सेल रफिक दादा, बार कौन्सिल अध्यक्ष विठ्ठल कोंडे-देशमुख, प्रिन्सेस आशाराणी गायकवाड व मान्यवर उपस्थित होते.

# मराठी भाषा कृतीपुस्तिका निर्मितीसाठी नागपूर जिल्ह्यातील ९ शिक्षकरत्नांची निवड



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार नव्या अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता पहिली ते पाचवीच्या मराठी भाषेतील कृतीपुस्तिका (आर- १ व आर -२) निर्मितीसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्यापरिषद), पुणे यांच्यावतीने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या महत्वाच्या कार्यशाळेसाठी राज्यभरातून गुणवंत व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या शिक्षकांची निवड करण्यात आली असून नागपूर जिल्ह्यातून एकूण नऊ शिक्षकांचा समावेश करण्यात आला होता.

या कार्यशाळेत नागपूर जिल्ह्यातून तंत्रस्नेही शिक्षक ओंकार पाटील, शिक्षण अभ्यासक राजेंद्र टेकाडे, आदर्श विज्ञान शिक्षिका वसुंधरा धोटे, आदर्श मुख्याध्यापिका मिरा मुसळे, आदर्श शिक्षिका सपना मानकर, तंत्रस्नेही शिक्षिका सरीता वागदे, साधनव्यक्ती देवराव पेलने, उपक्रमशील शिक्षिका पौर्णिमा पडधान व तंत्रस्नेही शिक्षक चंद्रकांत रोकडे यांची निवड करण्यात आली होती. या शिक्षकांनी कार्यशाळेत सहभागी होत मराठी भाषेच्या कृतीपुस्तिकेच्या निर्मितीत सक्रिय सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित, आनंददायी, कृतीयुक्त, ज्ञानरचनावादी आणि सुलभ शिक्षण उपलब्ध व्हावे. यासाठी शिक्षण तज्ज्ञ, विद्यापरिषद अधिकारी आणि नामवंत शिक्षक यांच्यासोबत ही कृतीपुस्तिका विकसित केली जात आहे. या प्रक्रियेत विद्यापरिषदेचे संचालक राहुल रेखावार (आय ए एस) आणि भाषा विभागाचे प्रमुख डॉ.ज्ञानेश्वर नागरे यांचे सक्रिय मार्गदर्शन लाभले.

महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेले शिक्षक ज्ञाननिर्मितीच्या या प्रवासात सहभागी होत एक सर्जनशील अध्यापन साचा उभा करीत आहेत. सीबीएसई पॅटर्नच्या नव्या अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ही कृतीपुस्तिका विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, भाषिक आणि भावनिक विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे. नागपूर जिल्ह्यातील शिक्षकांची निवड ही गौरवाची बाब असून त्यांचे कार्य सर्व शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# थकीत देयकांच्या मागणीसाठी धाराशिव कंत्राटदार संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन




**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०६, धाराशिव :** राज्यातील सर्व विभागाकडील ओपन कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता, हॉट मिक्स धारक कंत्राटदार, मजुर संस्था आणि विकासक यांची विविध विभागाकडील ८९ हजार कोटींची देयके रखडली आहेत. ही देयके तातडीने देण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्याकडे धाराशिव कंत्राटदार संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. धाराशिव कंत्राटदार संघटनेच्या वतीने शुक्रवारी मागणीचे निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले की, कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजुर संस्था, विकासक हे राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, नगरविकास, जलसंधारण व जलसंपदा विभाग, जलजीवन मिशन, सारखे अनेक विभागाकडील शासनाची विकासांची कामे करीत आहेत, परंतु गेल्या आठ-दहा महिन्यांपासून सदर शासनाची विकासांची कामे केलेल्या वर्गाची देयके शासन दरबारी मिळत नाहीत. सर्व विभागाकडील एकुण ८९ हजार कोटी रूपये एवढ्या मोठ्या रकमेची देयके प्रलंबित आहेत. यासाठी गेल्या वर्षभरापासुन राज्यातील सर्व विभागाकडील विकासाची कामे केलेल्या सदर वर्गाने धरणे आंदोलन, आमरण उपोषण, मोर्चा, मंत्रीमहोदय, अधिकारी यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करुन निवेदन देऊन लोकशाहीस अभिप्रेत असलेल्या अनेक मार्गाने सर्व महाराष्ट्र भर सातत्याने प्रयत्न करीत आहेत.

आजतागायत शासन व प्रशासन फक्त एवढे मोठी घटना असुनही सदर गंभीर विषयाकडे कायम दुर्लक्ष करीत आहे. हे महाराष्ट्र शासनाच्या उज्वल परंपरा व नावलौकिकास शोभत नाही. तसेच वारंवार मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व इतर संबंधित मंत्री व इतर प्रशासकीय स्तरावर निवेदन देऊनही या गंभीर विषयावर संघटनेच्या शिष्टमंडळाबरोबर चर्चा करण्यासाठी वरील सर्व मान्यवरांनी बैठकीस वेळ दिला नाही.

तरी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात सदर निवेदन संघटनांच्या वतीने सादर करण्यात आले आहे. याबाबत तातडीने, शासन, राज्यकर्ते व प्रशासनाने मार्ग काढावा अन्यथा शेती नंतरचा सगळ्यात मोठा व्यवसाय व या व्यवसायावर अवलंबून असलेले करोडो घटकांचे कुटुंब व त्यांचा चरितार्थ हे आर्थिक अडचणी तर येतील. पर्यायाने राज्याची सर्व जनताभिमुख विकासाची कामे या चक्रव्यूहात अडकून बसतील. तरी शासनाने मागणीची दखल घेऊन तातडीने देयके अदा करावीत, असे निवेदनात नमूद केले आहे.


निवेदनावर धाराशिव कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष सज्जणराव साळुंके, सचिव के.डी.घोडके, संदीप पवार, डी.बी.शिंदे, बालाजी कंट्रकशन, व्ही.बी.मोटे इन्फ्रा, संदीप ठोंबरे, एन.एम.शिंदे, ए.जी.गरड, अनुज कुडाळ, मे.डी.सी.अजमेरा, के.एफ. पठाण, रमिज तांबोळी, पृथ्वीराज देडे, ए.डी.कोकाटे, सागर कंट्रकशन, नागनाथ कंट्रकशन आदींची स्वाक्षरी आहे.

### ..अन्यथा तीव्र आंदोलन करणार - साळुंके

विकासकामांची देयके मिळावी यासाठी कंत्राटदार संघटनेच्या वतीने आम्ही वेळोवेळी आंदोलने करून, निवेदने दिली. परंतु सरकारने दखल घेतली नाही. त्यामुळे सरकारने आधीची देयके तातडीने द्यावीत. तोपर्यंत नवीन कामे काढू नये. देयके अदा न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल. याची सरकारने दखल घ्यावी.

**सज्जनराव साळुंके (अध्यक्ष, धाराशिव कंत्राटदार संघटना)**

# आषाढी एकादशीला खापरखेडा-भानेगाव परिसरात अवतरली पंढरी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** नाम विठ्ठलाचे घेऊ, सारे वाळवंटी जावू दिंडी आली दारावरी, चला पंढरीला जाऊ या विठ्ठलाच्या भजनाचे नामस्मरण करून दिंडी यात्रेत टाळ मृदंगाच्या तालावर नाचत गाजत खापरखेडा परिसरातील शेकडो वारकरी बंधू भगिनी एकत्र येत दिनांक ०६ जुलै २०२५ रोजी देवशयनी आषाढी एकादशी मोठ्या विविध धार्मिक कार्यक्रमांतर्गत उत्साहात साजरी केली. याप्रसंगी दिंडी यात्रेत परिसरातील वारकऱ्यांचे भजन मंडळ व दिंड्या सामील झाल्या होत्या. त्यामूळे खापरखेडा परिसरात जणू पंढरी अवतरल्याचे जाणवत होते. देवशयनी आषाढी एकादशीचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे यंदाही वारकरी बांधवांच्या वतीने दिंडी यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. दिंडी यात्रेत परिसरातील भजनमंडळ व दिंड्या सहभागी झाल्या होत्या. वारकरी टाळ मृदंगाच्या तालावर नाचत गाजत विठू माझा लेकुरवाळा, पाऊले चालती पंढरीची वाट, विठू माहुली तू माहुली जगाची, विठ्ठल आवडी प्रेमभावे, विठ्ठलाच्या पायी वीट झाली भाग्यवंत अशी एकापेक्षा एक सरस भजने म्हणून वारकरी बंधू भगिनींनी परिसर दणाणून सोडला होता. हनुमान मंदिर रेल्वे चौकी वार्ड क्रमांक १, राम मंदिर प्रकाश नगर वसाहत, नविन बिना हनुमान मंदिर, उपासे ले आउट, शिक्षक कॉलनी, साई मंदिर व हनुमान मंदिर भानेगाव, जय दुर्गा मंदिर नविन बिना,हनुमान मंदिर छत्रपती संभाजी महाराज उद्यान आदी परिसरात दिंडी यात्रेचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी वारकरी बांधवांनी रिंगण तयार करून विठ्ठल नामाचे स्मरण केले.

# विकास कामे खऱ्या अर्थाने जनतेने करून घेतली पाहिजे - महसूल मंत्री बावनकुळे

## चनकापूर पोटा येथे ७ कोटी ३४ लाख रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** आमदार, खासदार, पालकमंत्री विकास कामांसाठी निधी देत असतात. मात्र खऱ्या अर्थाने आपल्या घरा समोरील विकास कामे जनतेने उभे राहून करून घेतली पाहिजे. तरच उत्तम दर्जाची विकास कामे होतील अन्यथा अर्धे तुम्ही अर्धे आम्ही, रोजगार हमी झाल्या शिवाय राहणार नाही असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. दिनांक ०५ जुलै २०२५ रोजी पोटा (चनकापूर) येथे प्रधानमंत्री ग्रामीण खनिज कल्याण निधी अंतर्गत मंजूर झालेल्या ७ कोटी ३४ लाख रुपयांच्या विविध विकास कामांच्या भूमीपूजनाला आले असतांना बोलत होते.

मंचावर खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार डॉ. आशिष देशमुख, डॉ. राजीव पोतदार, जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, रामराव मोवाडे, उपविभागीय अधिकारी संपत खलाटे, सामाजिक कार्यकर्ते शांताराम गावंडे, रीपाचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज बोरकर, माजी जि. प. सदस्य प्रकाश खापरे, निलिमा उईके, खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे अभियंता गिरीश कुमारवार, भानेगाव सरपंच शालिनी चवरे, पोटा (चनकापूर) ग्रामपंचायतचे सरपंच पवन धुर्वे, उपसरपंच विश्वजित सिंह, प्रमोद पिंपळे, अशोक तांदूळकर, किशोर मुसळे, विलास महल्ले, रुपेश सावरकर, सिद्धार्थ मनेराव, राजेंद्र इंगोले आदि उपस्थित होते.

गौण खनिज निधी अंतर्गत मिलनचौक ते रोहना सिमेंट रस्ता व पोटा चनकापूर वार्ड क्रमांक १ ते ५ मध्ये विविध विकास कामे करण्यात येणार आहेत. यावेळी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन गणेश गायकवाड, आभार नितीन गोस्वामी यांनी मानले.

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजने अंतर्गत पोटा (चनकापूर) ग्रामपंचायत हद्दीत ७ लाख ३४ लाख रुपयांची विकासकामे १८ एप्रिल २०२२ रोजी मंजूर करण्यात आली होती. मात्र, राजकारण आडवं



आल सरकार बदलले विकास कामांवर स्थगिती देण्यात आली. गौण खनिज निधीतून मंजूर कामे त्वरित सुरू करण्यासाठी माजी जि.प.सदस्य प्रकाश खापरे व माजी पंचायत समिती उपसभापती राहुल तिवारी यांनी आमरण उपोषण केले मात्र विकास कामे सुरू झाली नाही. तब्बल ३ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर भूमिपूजन झाले.

# थोडक्यात

## जिल्हा परिषद केंद्र शाळा शेरे येथे आषाढी वारीचा कार्यक्रम



**अक्षराज : गणेश गायकर**

**दि.०५, शहापूर (ठाणे) :** शेरे या गावांमध्ये जिल्हा परिषद केंद्र शाळा शेरे या शाळेत वारकरी संप्रदायाची एक अत्यंत महत्त्वाची मुलांनी वारी साजरी केली. मुख्याध्यापिका सुजाता गाडगे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे या वारीत वारकरी पंढरपूरकडे जातात आणि विठोबाच्या चरणी माथा टेकवतात. ज्यात वारकरी, महिला, मुले, आणि वृद्ध सर्वजण सहभाग घेतात. वारीचे गीत, भजन, आणि अभंग यांचे गायन भक्तांना आध्यात्मिक आनंद देतात. त्याच प्रमाणे जिल्हा परिषद केंद्र शाळा शेरे या शाळेतील मुलामुलींनी विविध वेशभूषा तसेच विठ्ठल रखुमाई वेश बरिधान करून विठूचा वारीत तल्लीन झाले. त्याचबरोबर शुभांगी शिंदे, अर्चना मोरे, प्रेरणा जाधव या शिक्षकांनी ही विठ्ठल भक्तीचा जागर केला. संपूर्ण शाळा व गावकरी भक्तिमय झाले विठ्ठल नामाचा गरज शेरे गावात घुमाला विविध खेळ गाणी भक्ती गीते वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना आध्यात्मिक आनंद मिळतो. वारकरी एकमेकांना माऊली म्हणून संबोधतात आणि सर्वजण एकत्र येऊन विठोबाच्या भक्तीत मग्न होतात. वारीतून शेरे गावातील एकता, प्रेम आणि समर्पणाचे दर्शन घडते. वारकरी संप्रदायात कोणताही भेदभाव नसतो आणि सर्वजण एकत्र येऊन विठोबाच्या भक्तीत लीन होतात. हे शेरे गावातील शाळेतील मुलांनी साजरा केला.

# कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेड विरोधात बल्लारपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

## शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आ.मुनगंटीवार यांची कायदेशीर लढ्याची ठाम भूमिका



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, बल्लारपूर (चंद्रपूर) :** शेतकऱ्यांना रासायनिक खत देताना जबरदस्तीने इतर उत्पादने खरेदीस भाग पाडणाऱ्या कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनी विरोधात शनिवार, दिनांक ०५ जुलै २०२५ रोजी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी हे पाऊल उचलण्यात आले असून, या प्रकरणी तातडीने कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

शेतकऱ्यांना खताचा पुरवठा करण्यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या कृषी अधिकारी यांनी खताचे वाटप आणि वितरण कसे करावे, याबाबत कोरोमंडल कंपनीला स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. त्यानंतरही कोरोमंडल शेतकऱ्यांना अनावश्यक उत्पादने घेण्यास जबरदस्ती करीत आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी कोरोमंडल कंपनीला दोन नोटीस दिल्या. लिंकिंगचा हट्ट धरू नये, असे सुचवले. त्यानंतर ही कंपनी शेतकऱ्यांना डीएपीची खरेदी करताना सल्फर, पीडीएम पोटॅश आणि १५:१५:१५ खते जबरदस्तीने घ्यायला लावत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत असल्याचे आ. मुनगंटीवार म्हणाले.

ते पुढे म्हणाले, या संदर्भात मी कृषी विभागाचे सचिव विकास रस्तोगी यांची वैयक्तिकरित्या भेट घेतली आणि चंद्रपूर जिल्ह्यात अशा प्रकारचे शेतकऱ्यांविरोधातील अन्यायकारक प्रकार होऊ नयेत, याबाबत त्यांचे लक्ष वेधले. 'जगाच्या पोशिंद्यांवर असा अन्याय होतो आहे,' हे त्यांच्यासमोर स्पष्टपणे मांडले. तसेच, कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेडचे विक्री व विपणन उपप्रबंधक प्रितम सिंह यांच्याशीही मी संवाद साधला. त्यांना विनंती केली की, शेतकऱ्यांवर जबरदस्ती थोपवू नका आणि झालेल्या चुका तात्काळ दुरुस्त करा.

कोरोमंडल लिमिटेड आणि कंपनीचे विक्री व विपणन उपप्रबंधक प्रितम सिंह यांच्या विरुद्ध तक्रार देताना भाजपचे स्थानिक नेते, कार्यकर्ते तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जीवनावश्यक वस्तू प्रतिबंधक अधिनियम ंतर्गत योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशीही आ.सुधीर मुनगंटीवार यांनी मागणी केली आहे. शेतकऱ्यांचे शोषण थांबले नाही, तर यापुढे आंदोलनात्मक मार्गही अवलंबण्यात येईल, असा इशारा ही आ.मुनगंटीवार यांनी यावेळी दिला.

**कायदेशीर लढा उभारण्याचा निर्णय**

शेतकऱ्यांना रासायनिक खत पुरवठा करताना जबरदस्तीने इतर वस्तू विकत घेण्यास भाग पाडणाऱ्या खत पुरवठाधारकांविरोधात कायदेशीर लढा उभारण्याचा निर्णय आ. मुनगंटीवार यांनी घेतला आहे. त्याचाच भाग म्हणून आज तक्रार दाखल करण्यात आली.

## राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुल खंडुखैरेवाडी येथे पालखी सोहळा संपन्न



**अक्षराज : शरद भगत**

**दि.०५, खंडुखैरेवाडी (बारामती) :** आषाढी एकादशी निमित्त राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुल चा पालखी सोहळा कार्यक्रम मोरगाव या ठिकाणी संपन्न झाला. आषाढी एकादशीच्या निमित्ताने संपूर्ण राज्यभरात विठुरायाच्या दर्शनासाठी संताच्या पालखी पंढरपुराकडे जात असतात. ही संस्कृती भावी पिढीला समजण्यासाठी व परंपरा कायम चालू राहावी. यासाठी खंडुखैरेवाडी येथील राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुलच्या वतीने पालखी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या पालखी वारीमध्ये नर्सरी ते दहावी चे विद्यार्थी वारकरांच्या वेशभुषेत दिंडीमध्ये सहभागी झाले होते. राजे प्रतिष्ठान न्यु इग्लिंश स्कुलवर या पालखीचे गोलरिंगण पार पडले. तर मोरगाव या ठिकाणी विद्यार्थ्यांनी वारकरी फुगडी, लाठी काठी, लेझीमचे तसेच आकर्षक कार्यक्रम सादर केले. पालखी मयुरेश्वर मंदिरात जाऊन गणपती बाप्पाचे दर्शन घेऊन विद्यार्थ्यांना पाणी व थोडा अल्प प्रहार देण्याात आला. राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुल हा पालखीचा कार्यक्रम १८ वर्षांपासून राबवत असून विद्यार्थ्यानां आपल्या संस्कृतीचा वारसा समजावा यासाठी राजे प्रतिष्ठान हा कार्यक्रम राबवत असते.

वारीमध्ये सर्वधर्मातील, सर्व जातीतील विद्यार्थी ही सहभागी झाली होती. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुलच्या सचिव मनिषा खैरे, प्राचार्या वनिता कस्तुरे व सहशिक्षिका मीना तावरे, प्रतिक्षा ताकवले, वैशाली भोंडवे, विचारे सई, राहुल यादव, राजाराम खैरे, मोनाली भोसले, सारिका भोंडवे, कोमल गार्डी, साक्षी भोसले, प्रज्ञा बालगुडे, सायली कोरफडे, शुभांगी जाधव, सुमित जगदाळे यांनी जास्त मेहनत करून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली. विद्यार्थ्यानां मोरगाव या ठिकाणा पर्यंत बसने सोडवण्याचे काम सर्व बस चालकांनी केले. अशी माहीती वैभव जराड यांनी दिली. या पालखी सोहळ्याचे दर्शन घेत विद्यालयाला शुभेच्छा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलिप आप्पा खैरे यांनी दिल्या.

# ज्येष्ठ नागरिकांच्या सुखकर प्रवासासाठी मुंबई लोकलला लागणार स्वतंत्र डबा

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०६, मुंबई :** मुंबईची लोकल ट्रेन ही समस्त मुंबईकरांची लाईफलाईन मानली जाते. दररोज लाखो प्रवासी या लोकलने प्रवास करतात. यामध्ये पुरुष आणि महिला प्रवाशांसोबतच ज्येष्ठ नागरिकांची सख्या सुद्धा मोठी असते. याच जेष्ठ नागरिकांच्या प्रवासाला अधिक आरामदायी आणि सुखकर बनवण्यासाठी रेल्वे प्रशासनाने आता एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून त्याबद्दलचे रचनात्मक बदलही करण्यात आले आहेत. या निर्णयाचा फायदा ज्येष्ठ नागरिकांना होणार आहेत. रेल्वेने प्रवास आरामदायी होण्यासाठी लोकलचा मालडबा ज्येष्ठ नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. मध्य रेल्वेने माटुंगा कारखान्यात लोकलच्या मालडब्यात बदल करून ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र आकर्षक डबा तयार झाला आहे.



मध्य रेल्वेवरील प्रत्येक लोकलमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. लोकलमध्ये प्रथम श्रेणी, द्वितीय श्रेणी असे डब्याचे प्रकार आहेत. तर, महिला, दिव्यांग आणि मालवाहतुकीसाठी स्वतंत्र डबे आहेत. गरोदर स्त्रियांना आणि ज्येष्ठ नागरिकांना लोकलच्या डब्यात काही आसने राखीव आहेत. मात्र, ज्येष्ठ नागरिकांना गर्दीतून प्रवास करणे कठीण होते.

लोकलमधील गर्दीचा विचार करता ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या राखीव आसनापर्यंत पोहोचणे अशक्य होते. त्यामुळे मध्य रेल्वेने लोकलच्या माल डब्यात बदल करून ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डबा तयार केला आहे. त्यामुळे पहिला लोकल रेक तयार झाला असून येत्या काळात मध्य रेल्वेवरील सर्व रेकमध्ये बदल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.रेल्वे मंडळाच्या निर्देशानुसार, माटुंगा कारखान्यातील पथकाने, लोकलच्या मालडब्याचे रूपांतर करून ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी स्वतंत्र डबा तयार केला आहे. या डब्यामुळे लोकलमध्ये चढताना, उतरताना ज्येष्ठ नागरिकांना येणाऱ्या अडचणी कमी होतील आणि आरामदायी आणि सुरक्षित प्रवास सुनिश्चित होईल, अशी माहिती मध्य रेल्वे प्रशासनाने दिली.दरम्यान या डब्यात आसन व्यवस्था वाढवून १३ प्रवाशांना बसता येईल, एवढी आसने या नव्या रचनेमध्ये असणार आहेत. तसेच प्रवाशांची सुरक्षितता वाढविण्यासाठी दरवाजाच्या पायदानाखाली आपत्कालीन शिडी देखील बसवली आहे. माल डब्याच्या दरवाज्याजवळ पूर्वी खांब नव्हता. परंतु आता या डब्यात बदल करताना दोन्ही दरवाज्याजवळ खांब लावण्यात आला आहे. तसेच लोकल डब्यात आकर्षक देखावे सुद्धा लावण्यात आले आहेत. मुंबई उपनगरीय रेल्वेतून ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, दिव्यांग प्रवाशांप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डबा उपलब्ध करण्याची मागणी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिकेद्वारे केली होती. ज्येष्ठ नागरिकांसाठी लोकलमध्ये स्वतंत्र डबा उपलब्ध करून दिला जाईल, असे रेल्वे प्रशासनाने न्यायलयाला आश्वासित केले होते. तसेच लवकरात लवकर कार्यादेश करण्याचे न्यायालयाने रेल्वे प्रशासनाला दिले होते. त्यानंतर पश्चिम रेल्वे प्रशासनाने हे काम करण्यास सुरुवात केली. त्यामागोमाग मध्य रेल्वेने सुरुवात केली आहे.

## आषाढी एकादशीनिमित्त लिटल चॅम्प स्कूल ची दिंडी



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०५, धाराशिव :** विठ्ठल नामाची शाळा भरली.. अशा विठ्ठल नामाच्या गजरात आषाढी एकादशी निमित्त शहरातील तांबरी विभागातील लिटल चॅम्प स्कूलमधील चिमुकल्यांनी भक्तीमय वातावरणात दिंडी काढली. चिमुकल्यांच्या या दिंडीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

आषाढीच्या पूर्वसंध्येला चिमुकल्यांनी हरिनामाचा गजर करून परिसर दुमदुमून सोडला. या दिंडीत बालवारकरी हातात भगव्या पताका, टाळ, मृदंग, वीणा घेऊन सहभागी झाले होते. चिमुकल्यांनी दिंडीत पांडुरंग-रुक्मिणी, संतांच्या वेशभुषा, पालखी, टाळ, मृदंग घेऊन पारंपारिक वेशभूषेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. बाल वारकऱ्यांच्या या दिंडीचे नागरिकांनी कौतुक केले. दिंडीसाठी शाळेतील शिक्षक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बल्लारपूर येथील घरफोडी प्रकरणी २ आरोपींना मुद्देमालासह अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** बल्लारपूर बामणी येथील मुलचंदानी ले आऊट, टीचर कॉलनी येथे इस्तायिक अली जाकिर अली सय्यद यांचा घरी २ ते ३ जुलै चा मध्यरात्री चोरांनी घराचा मुख्य कुलूप फोडून घरात प्रवेश करून सोन्याचे बारी, अंगुठी, चैन, मंगळसूत्र असे एकूण ५० ग्रॅम दागिने सह जुना वापरता मोबाईल, नगदी असे एकूण २ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरांनी लंपास केले आहे.

दिनांक ०५ जुलै २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर चे पथक गुन्हेगार शोध मोहीम राबवत असताना रेकॉर्ड वरील गुन्हेगार अतुल उर्फ मुजोर विकास राणा (२६) रा. भगतसिंग वार्ड बंगाली कॅम्प चंद्रपूर आणि ऋषेश उर्फ कोब्रा चंद्रभान आत्राम (२४) रा. विसापूर यांनी बल्लारपूर पोस्ट हद्दीत घरफोडी केल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर दोन्ही गुन्हेगारांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी बल्लारपूर येथे घरफोडी केल्याचे कबुली दिले. आरोपी कडून बल्लारपूर येथील घरफोडी येथील सोन्याचे मंगळसुत्र, सोन्याची एक चैन, सोन्याची दोन आंगठी, चोरीस गेलेला रेडमी कंपनीचा मोबाईल, रोख ४००/- असा एकुण १ लाख ५३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केले.

रामनगर पोलीस स्टेशन हद्दीत घरफोडीचे दोन गुन्हे आणि राजुरा हद्दीत एक मोटार सायकल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिले आहे. राजुरा हद्दीतून चोरी केलेली होंडा शाईन मोटार सायकल क्रं एम एच ३४ एक्स ५१५९ किंमत ४० हजार रुपये जप्त केले. आरोपी याच दुचाकी चा वापर करून घरफोडी करत होते. तसेच पो.स्टे. रामनगर अप.क्र. ४८४/२०२५ आणि ५७०/२०२४ कलम ३०५ (ए), ३३१(३) भारतीय न्याय संहिता गुन्ह्याचा छडा लागला आहे. आरोपी कडून एकुण १ लाख ९३ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात येवुन आरोपींना बल्लारपूर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

आज बल्लारपूर पोलीसांनी आरोपी कडून घरफोडी मधील मुद्देमाल हस्तगत केले असून आरोपींना न्यायालयात पोलीस कोठडी ची मागणी केली असता न्यायालयाने आरोपींना एमसीआर देऊन तुरुंगात रवानगी केली.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचे नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक कांक्रेडवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक बलराम झाडोकर, पोलीस उपनिरीक्षक संतोष निंबोरकर, पोलीस उपनिरीक्षक सर्वेश बेलसरे, पोहवा जयसिंह, गणेश मोहुर्ले, नापोअं संतोष येलपुलवार, पोअं नितीन रायपुरे, मिलींद जांभुळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी केली आहे.